—: प्रेसनोट :—　　　　　　　　　दि. २०/१०/२०२०

**यातील फिर्यादी यांनी त्यांच्या दुकान गाळयाच्या नकाशाची माहिती अधिकार अधिनियमांतर्गत मागणी केली होती. सदर नकाशाची प्रत देण्याकरीता यातील आरोपी लोकसेवकाने रु. १,०००/—लाचेची मागणी करुन स्विकारली म्हणुन गुन्हा नोद.**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | मुंबई विभाग |
| गुन्हा नोंद कमांक | १८/२०२० |
| कलम | कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ |
| आरोपीताचे नाव व कार्यालय | यशवंत तानू धडशी, वय ५२ वर्षे, धंदा—कार्यालयीन शिपाई (नेमणुक उप मुख्य अभियंता कार्यालय, इमारत प्रस्ताव शहर, बृहन्मुंबई महानगरपालिका, वाल्मीकी चौक, विद्यालंकार कॉलेज रोड, संगम नगर, वडाळा, मुंबई.) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | रु. १,०००/— |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | रु. १,०००/— |
| थोडक्यात माहिती | यातील फिर्यादी यांना त्यांचे मालकीचे आग्रीपाडा येथील दुकान गाळयामध्ये झालेल्या अतिक्रमणाविरुध्द तक्रार करण्यासाठी गाळयाच्या नकाशाची आवश्यकता होती. त्याकरीता त्यांनी यातील आलोसे यांचे कार्यालय, उप मुख्य अभियंता कार्यालय, इमारत प्रस्ताव शहर, बृहन्मुंबई महानगरपालिका, वाल्मीकी चौक, विद्यालंकार कॉलेज रोड, संगम नगर, वडाळा, मुंबई येथे दिनांक १५/०९/२०२० रोजी माहिती अधिकार अधिनियमांतर्गत माहिती मिळण्यासाठी अर्ज केला होता. सदरची माहिती देण्याकरीता यातील नमुद आरोपी लोकसेवकाने रु. १,०००/— च्या लाचेची मागणी केली होती.<br><br>फिर्यादी यांना नमुद आरोपी लोकसेवकास लाच दयावयाची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी, मुंबई येथे दि. १९/१०/२०२० रोजी समक्ष हजर राहून आरोपी लोकसेवका विरुध्द लेखी तक्रार दिली.<br><br>फिर्यादी यांच्या लेखी तक्रारीवरुन दिनांक २०/१०/२०२० रोजी केलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान आरोपी लोकसेवकाने पंचासमक्ष रु. १,०००/— लाचेची मागणी केली. त्यानंतर सापळा कारवाई दरम्यान पंचासमक्ष रु. १,०००/— ची लाच स्विकारतांना आरोपी लोकसेवकास रंगेहाथ पकडण्यात आले. |

अपर पोलीस उप-आयुक्त　सत्यमेव जयते　बृहन्मुंबई　लाचलुचपत प्रतिबंधक विभाग

20/10/20

( रमेश धुमाळ )
अपर पोलीस उप आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग मुंबई

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारा संबधीत काही माहिती असल्यास अगर लाच मागणा—या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबधंक विभाग, मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

**संपर्क—** लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग ९१, सरपोचखानवाला रोड, वरळी, मुंबई ३०

**संकेतस्थळ—**acbmaharastra.gov.in

**ईमेल—** १) acbwebmail@mahapolice.gov.in २) addlcpacbmumbai@mahapolice.gov.in.

**ऑनलाईन तक्रार**

**मोबाईल ॲप** www.acbmaharastra.net. **टोल फ्रि.क.** १०६४

**फेसबुक** www.facebook .com – Maharashtra ACB **व्हॉटस ॲप क्र.** ९९३०९९७७००

**दुरध्वनी क.** ०२२ २४९२१२१२ **फॅक्स. क.** ०२२२४९२२६१८,